# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.२६/०६/२०१८

## दि.२५/०६/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे ४२८/१८,भादविक ३९४,३४ |
| **फिर्यादी** | मयुर सोनी,वय-१९ वर्षे,रा.आकुर्डी गाव,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०६/२०१८ रोजी २१/०० वा. थरमॅक्स कंपनीचे गेट नं.६ चे समोर थरमॅक्स चौक ते खंडोबा माळ चौक येथील सार्वजनिक रोडवर एमआयडीसी चिचवड,पुणे याठिकाणी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे वडील मफतलाल सोनी यांचेसह मोटार सायकलवरुन त्यांचे राहते घरी येत असताना,त्यांचे पाठीमागुन मोटार सायकलवरून आलेल्या तीन अनोळखी इसमांनी फिर्यादीस थांबवुन त्यांचे वडीलांचे डोळयात मिरची पावडर टाकल्याने दोघे डाव्या बाजुस फुटपाथवर पडल्याने त्यांना दुखापत झाली. त्यावेळी सदर इसमांनी फिर्यादी व त्यांचे वडील मफतलाल सोनी यांचे हातातील एक काळया रंगाची बॅग (छोटी) त्यामधील वीस चाव्या व सोन्याचे मणी असा एकुण २९,१००/- रु किचा ऐवज जबरदस्तीने चोरुन नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एस.सुर्यवंशी ९७६७८५११०० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे १६५/१८,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | निखिल ताडीलकर,वय-२७ वर्षे,रा.वडगांव-शेरी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०६/२०१८ रोजी १३/०० ते १४/०० वा.चे दरम्यान फ्लॅट नं.३,सरोज सोसायटी,स.नं. ४७/३, सुनितानगर,जुना मुंढवा रोड जवळ,वडगांव-शेरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरुम मधील कपाटातील सोन्याचे दागिने ३,२८,०००/- रु किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे), सत्यवान पाटील ९५४५९०३१०० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दिघी पो स्टे १६६/१८,भादविक ३०४(अ),३४ |
| **फिर्यादी** | राजेद्रं गिरी,सहा.पोलीस निरीक्षक,दिघी पोलीस स्टेशन,पुणे शहर |
| **आरोपी** | १.भावेश पटेल,रा.साईकृपा अपार्टमेन्ट,प्लॉट नं.९७/३२,सेक्शन नं.६,मोशी, प्राधि करण,पुणे २. चेतन मोहनभाई पटेल,वय-३५ वर्षे,रा.साईकृपा अपार्टमेन्ट,फ्लॅट नं.२०३, मोशी, प्राधिकरण, पुणे ३.इरफान अली खान,वय-३४ वर्षे,रा.२८३,श्रीनगर,राहटणी,काळेवाडी,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०६/२०१८ रोजी सकाळी ११/२० वा. राधे रिगल रेसिडन्सी,बांधकाम साईट,धायरकर वस्ती,डुडुळगाव,ता.हवेली,जि.पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम पांडुरंग बसप्पा चव्हाण हे इंजिनीयर व बांधकाम व्यवसायीक असुन इतर इसम हे बांधकाम साईटवर देखरेख करतात. सदर इसमांनी त्यांचे राधे रिगल रेसिडन्सी, बांधकाम साईट,धायरकर वस्ती,डुडुळगाव,ता.हवेली,जि.पुणे येथील बांधकाम चालु असलेल्या साईटवर बिल्डींगचे मधोमध पार्किंगचे मोकळ्या जागेत सामान वर खाली ने-आण करण्या साठी लोंखडी क्रेन / मालवाहु लिफ्ट लावण्यात आली होती. सदर लिफ्टवर मजुर कामगारां कडुन काम करवुन घेत असताना,कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टी कोनातुन त्यांना हेल्मेट,सुरक्षित जाळी,सेफ्टी बेल्ट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना, |

| | |
|---|---|
| | त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने देऊन ती वापरली आहे कि नाही याची खात्री करण्याची जबाबदारी त्यांचेवर असतानादेखील,सदर कामगारांना लिफ्टवर कामाला लावुन, हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे,यातील बिगारी कामगार हे बिल्डींगचे आर.सी.सी. बांधकामासाठी लावलेली लोखंडी क्रेन / मालवाहु लिफ्टचे लोखंडी टॉवर काढण्यासाठी लिफ्ट मधुन सहाव्या मजल्यावर १.पांडुरंग बसप्पा चव्हाण,वय ३५ वर्षे,रा.राधे रिगल रेसिडन्सी,लेबर कॅम्प,धायरकर वस्ती,डुडुळगाव,ता.हवेली,जि.पुणे २.भगवान गायकवाड,वय-२९ वर्षे,रा.सदर ३.अमर हेमलप्पा राठोड,वय-२८ वर्षे,रा.सदर हे कामगार जात असताना, अचानक मालवाहु लिफ्टचा वायर रोप तुटुन,ती मालवाहु लिफ्टसह हे तीन कामगार खाली पडुन,त्यामध्ये गंभीर जखमी होवुन तीन्ही कामगारांचे मृत्युस कारणीभुत ठरले आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. आर.एम.गिरी ९८२२३८००९० |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सांगवी पो स्टे ३०३/१८,भादविक ३०६,३०४ (ब)(२),४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | ब्रजेश ठाकुर,वय-३५ वर्षे,रा.मु.पो ढोलबज्जा,ठाणा फारबिसगंज,जिल्हा अररिया,बिहार |
| **आरोपी** | कुमार विभुती भुषण ऊर्फ नन्हे अरविंदकुमार देव,वय-२९ वर्षे,रा.पवार नगर गल्ल्ी नं.१,जुनी सांगवी,पुणे व इतर दोन (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे ऑगस्ट २०१७ रोजीपासुन ते दि.२३/०६/२०१८ रोजीचे कालावधीत शिवप्रताप हौसिंग सोसायटी,बी-विंग,फलॅट नं.३२,अे,पवार नगर गल्ल्ी नं.१,जुनी सांगवी,पुणे तसेच मु.पो. चकला निर्मली वार्ड नं.७,थाना सुपौल,जिल्हा सुपौल,राज्य बिहार याठिकाणी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची बहीण सौ.मनिषाकुमारी कुमार विभुती भुषण ऊर्फ नन्हे अरविंदकुमार देव हिचे लग्न दि.२२/०६/२०१७ रोजी कुमार विभुती देव याचेबरोबर होवुन,ती सासरी नांदत असताना,यातील नमुद इसम तीचा पती कुमार विभुती देव व इतरांनी सौ.मनिषाकुमारी हिस वेळोवेळी दारू पिवुन येवुन शिवीगाळ व मारहाण करुन,तीला माहेरचे लोकांकडुन पैसे घेवुन ये नाहीतर तुला मारुन टाकीन,मला दुसरे लग्न करायचे आहे असे म्हणुन तीस माहेरचे लोकांकडुन पैसे घेवुन येण्यास लावुन वेळोवेळी तीचा शारिरीक व मानसिक छळ करून, सौ.मनिषाकुमारी हिस तीचे राहते घरी गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.के.आहेर ८८०५५४५५५६ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे १३०/१८,भादविक ४२० |
| **फिर्यादी** | एक ज्येष्ठ महिला,वय-६५ वर्षे,रा.बालाजीनगर,पुणे |
| **आरोपी** | एक अनोळखी इसम रंगाने सावळा,मध्यम बांधा,वय अंदाजे ३५ ते ३८ वर्षे,काळे केस, निळया रंगाचा फुल शर्ट, निळया रंगाची जिन्स पॅन्ट, पायात चप्पल, मराठी / हिंदी भाषेत बोलणारा |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०६/२०१८ रोजी १५/३० ते ०४/१५ वा.चे दरम्यान मोती चौका जवळ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद वर्णनाचे अनोळखी इसमाने फिर्यादी यांना १०,०००/- रुची साडी देतो असे अमिष दाखवुन,त्यांचेशी गोड बोलुन त्यांना विश्वासात घेवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्राची डिझाईन बघण्याचा बहाना करुन,त्यांचेकडुन ते काढुन घेवुन,त्याऐवजी त्यांना पाचशे रुपये नोटेत दोन दगड बांधुन सोन्याचे मंगळसुत्र परत देण्याचे बहाण्याने हात चलाखी करून,फिर्यादी यांचे ६२,०००/- रु किंमतीचे मंगळसुत्र घेवुन फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. वर्षा गुरव ७८४१९१४५५८ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे १७९/१८,भादविक ४२० |
| **फिर्यादी** | गणेश पवार,वय-१९ वर्षे,बालाजीनगर,पुणे |
| **आरोपी** | एक अनोळखी इसम,वय अंदाजे ३४ वर्ष,अंगाने मध्यम,उंची ५ फुट १० इंच,रंगाने गोरा, हिंदी भाषा,अंगात लाल रंगाचा टी-शर्ट, फिकट खाकी रंगाची जीन्स घातलेला |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०६/२०१८ रोजी १३/०३ वा. एच.डी.एफ.सी. बँक,सहकारनगर शाखे मध्ये |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे एच.डी.एफ.सी.सहकारनगर या शाखेतील बँके मध्ये त्यांचे कंपनीतील १,००,०००/- रुपये रोख भरण्यासाठी रांगेत उभा असताना,यातील नमुद वर्णनाचे एक अनोळखी इसमोन फिर्यादी यांचेकडे पेन मागुन,त्यांना त्यांचे हातातील नोटा नीट लावण्यास सांगुन,त्याने काही रक्कम त्याचे हातात घेऊन,फिर्यादी यांचे समोर नीट लावल्या सारख्या करुन,त्यांना बोलण्यात गुंतवुन,हातचलाखीने सदर रक्कमेपैकी २०००/- रुपये दराच्या ९ नोटा तसेच ५००/- रुपये दराच्या ३१ नोटा असे एकुण ३३,५००/- रुपये रोख रकमेच्या नोटा फसवणुक करून काढुन घेतल्या आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.एस.सरडे ९९२२६८६४४४ |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पिंपरी पो स्टे ४२६/१८,भादविक ४२०,४०६,३४ |
| **फिर्यादी** | निशा बमरा,वय-४० वर्षे,रा.मिलींदनगर पिंपरी,पुणे |
| **आरोपी** | दोन इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/१०/२०१७ ते आजपर्यंत शॉप नं.२,सावता माळी मंदिरा समोर पिंपरी गाव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करुन,फिर्यादी व इतर साक्षीदार १.सिमरन कैर मिस्त्री २.नंदा लक्ष्मण इंगळे ३.भागश्री जयद्रथ आखाडे ४.वनिता सुभाष काजळे ५.निर्मल दर्शनसिंग कुम्मन ६.रुपेश गौतम रिकिबे यांना नोकरी लावुन देण्याचे अमिष दाखवुन, त्यांचेकडुन वेळोवेळी एकुण ७,७५,०००/- (सात लाख,पंच्याहत्तर हजार रुपये) घेवुन फिर्यादी व इतर साक्षीदारांना नोकरी न लावता,त्यांचे पैशांचा अपहार करून फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.पी.निमगीरे ७५८८८२२४७ |
| **८** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे १३९/१८,भादविक ३३२,३५३ |
| **फिर्यादी** | सुरेखा साबळे, म.पो.हवा. लष्कर वाहतुक विभाग पुणे शहर |
| **आरोपी** | एक महिला,वय-३० वर्षे,रा.जगताप चौक,वानवडी,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०६/२०१८ रोजी १७/४५ ते १८/०० वा. चे दरम्यान महावीर चौक कॅम्प,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया नमुद ठिकाणी वाहतुकीचे नियमन करून त्यांचे शासकीय कर्तव्य बजावत असताना,यातील नमुद महिला हिने मोपेड दुचाकीवर येवुन नमुद ठिकाणी सिग्नल तोडुन जात असताना,फिर्यादी यांनी त्यांना थांबवुन चौकशी करीत असताना,सदर महिला हिने फिर्यादीस अपशब्द वापरून त्यांना धक्का-बुक्की करून,फिर्यादी हे करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला. तसेच फिर्यादी यांना मदतीसाठी आलेल्या महिला पोलीस कर्मचारी हिस चावा घेवुन त्यांना दुखापत केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पी.पी.खेडकर ८८३०५०१४५६ |
| **९** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे २१५/१८,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | नामदेव बिरादार,वय-३७ वर्षे,रा.बालाजीनगर धनकवडी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात व्यक्ती |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०६/२०१८ रोजी २१/०० ते दि.२५/०६/२०१८ रोजी सकाळी ०६/०० वा.चे दरम्यान निलंगा ते शंकरशेठ रोड रेल्वे तिकिट आरक्षण केंद्रा समोर स्वारगेट,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे लक्झरी बस मधुन प्रवास करीत असताना,त्यांनी त्यांचेकडील लाल काळया रंगाची बॅग त्यामध्ये असलेले सोन्याचे दागिने व एक मोबाईल असा एकुण ३,४०,३००/- रू किचा ऐवज असलेली बॅग बसचे लगेज बॉक्समध्ये ठेवली असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने सदरची बॅग नमुद ऐवजासह लगेज बॉक्स मधुन चोरी करुन नेली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. के.व्हि.पाडोळे ९७६३२९२०३४ |

१०

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे २८९/१८,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | शब्बीर शेख,वय-३०,रा.वडगांव-बुद्रुक,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०६/२०१८ रोजी पहाटे ०१/०० वा. नवले हॉस्पीटल बिल्डींग नं.३,पहिला मजला,न-हे, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे नवले हॉस्पीटल मध्ये भारतीय आयुर्विज्ञान परिषद,नवी दिल्ली यांनी दिलेले थम्ब मशीन ४ हजार रू किचे कोणीतरी अज्ञात इसमाने नमुद वेळी व ठिकाणाहुन चोरी करून नेले. (फिर्यादी हे थम्ब मशीनचे कागदपत्राचा शोध घेवुन त्यांनी आज तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.ना.जी.वाय.पवार ७३५०७९७७७७ |

१ **दि.२६/०६/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे १४०/१८,भादविक ३०७ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३१,रा.नाना पेठ,पुणे |
| **आरोपी** | मुस्ताक शेख,वय-४३,रा.मेंटल हॉस्पीटल क्वाटर्स,येरवडा,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०६/२०१८ रोजी २०/०० वा. गुरूव्दारा समोरील गल्ली मध्ये कॅम्प,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद इसम हे पती-पत्नी असुन,त्या दोघांमध्ये १० दिवसापुर्वी तोंडी तलाख झाला असुन,सदर इसम मुस्ताक शेख याने फिर्यादी यांचे मुलास समजावुन सांगायचे कारणाने फिर्यादीस नमुद ठिकाणी बोलावुन घेवुन,जुने भांडण काढुन फिर्यादीस तुला जास्त मस्ती आली आहे का असे म्हणुन त्याचे शर्टा मधील लपविलेला लोखंडी रॉड काढुन फिर्यादी यांचे डोक्यात दोन तीन वेळा मारून तीस गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. संतोष काटे ८८८८१२५५६६ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**